क्रमांक एलआरएफ २६९८/प्र.क्र. ७७०९/ज-३
महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक २७/९/९९

विषय- **जमिन- मुंबई उपनगर जिल्हा**
मौजे मालवणी स. नं. २६३ पै. नभूक्र. ६ अ पै मधील शैक्षणिक संकुलातील जमीन अथर्व एज्युकेशनल ट्रस्ट या संस्थेला अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी मंजूर करणे बाबत.

**शासन ज्ञापन:**

मौज मालवणी ता. बोरीवली स. नं. २६३ पै, नभुक्र. ६ अ पै मधील मंजूर सुधारीत विकास योजनेत शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित असलेली सुमारे १०,६०० चौ.मी. क्षेत्र ``अथर्व एज्युकेशनल ट्रस्ट`` या संस्थेला देण्याबाबत हेतूपत्र शासन ज्ञापन समक्रमांक दिनांक ६ मे १९९९ अन्वये देण्यात आले आहे. याबाबत शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, मौजे मालवणी स. नं. २६३ पै, नभूक्र ६ पै मधील शैक्षणिक संकुलातील भूखंड क्रमांक ८ ते १२ सुमारे १०,६०० चौ.मी. क्षेत्र ``अथर्व एज्युकेशनल ट्रस्ट`` या संस्थेला दिनांक ८/२/८३., दिनांक ११/५/८४ तथा दिनांक ३०/६/९२ च्या धोरणात्मक आदेशातील अटी व शर्तीवर (महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे नियम १९७१ च्या तरतूदीनुसार ) व दिनांक ६ मे १९९९ च्या हेतूपत्रातील अटी व शर्तीवर प्रस्तुत जमिनीचे सन १९९४ चे रुपये ३२५०/- (रुपये तीन हजार दोनशे पन्नास फक्त ) प्रती चौ. मी. ला इतके तात्पुरते मुल्यांकन मानुन त्यानुसार जमिनीच्या होणा-या एकुण किंमतीच्या ५०% सवलतीच्या रक्कमेवर प्रचलित दराने शासन परिपत्रक क्रमांक १०९७/२२१४/प्र.क्र. ९३/ज-१ दिनांक ६/८/९९ नुसार भुईभाडे आकारुन अभियांयत्रिकी महाविद्यालय व इतर अनुषंगिक इमारतींच्या बांधकामासाठी ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने पुढील अतिरिक्त अटींवर मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुतच्या जमिनीचे मुल्यांकन नगररचना व मुल्यनिर्धारण विभागाकडून तात्काळ करुन घेण्यात यावे.

२) नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागाने निश्चित केलेले अंतिम मुल्यांकन तात्पुरत्या मुल्यांकनाहून जास्त भरल्यास फरकाची रक्कम प्रचलित दराने

62
99

SEP

Scanned by CamScanner

त्या जागेसह भरणा करण्यास जिल्हाधिका-यांनी कार्यालयापासून १ महिन्यात भरणा करण्यास तयार असल्याचे हमीपत्र संस्थेकडून घ्यावे.

३) भाडेपट्टयाच्या दरात दर १० वर्षांनी सुधारणा करण्यात यावी.

४. हेतुपत्रातील अट क्र. २ व ३ मधील आवश्यक असलेली माहिती तसेच संकल्पित बांधकामाच्या प्रकल्पाचा सविस्तर तपशील संस्थेने तात्काळ जिल्हाधिकारी यांना पुरवावा.

५) सदर संस्था सर्व जातीधर्मांच्या व्यक्तींसाठी खुली असली पाहिजे.

६) जिल्हाधिका-यांना योग्य वाटतील अशा इतर अटी व शर्ती.

२. हे शासन वित्त विभागाच्या सहमतीने (अनौपचारिक संदर्भ क्र. ७८१/९९/व्यय-९, दिनांक १२.७.९९) निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(द.शि. फाटक)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
एम.एम.आर.डी.ए. इमारत,
वांद्रे (पूर्व) मुंबई -५१.

प्रतिलीपी :-

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई.
४) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
५) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा ), मुंबई/नागपूर
६) जिल्हा उपनिबंधक (३), सहकारी संस्था, तळमजला, म्हाडा इमारत, वांद्रे (पूर्व),मुंबई-५१
७) सहाय्यक संचालक, नगररचना मूल्यनिर्धारण, मुंबई उपनगर जिल्हा
८) नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९) वित्त विभाग, (व्यय-९),मंत्रालय,मुंबई
१०) ज-३ कार्यासन, (निवडनस्ती)

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

क्रमांक सी/कार्या-३डी/७२/कावी - ६१२/२००१
दिनांक : 2 /६/२००१

वाचले :- १) शासन ज्ञापन महसुल व वन विभाग क्र. २६९८/प्र.क्र. ७७०९/ज-३ दि. २७/९/९९
२) इकडील पत्र क्र. सी/कार्या ७अ/का.वि. ७७२/जमीन/९९ दि. १२/१०/९९
३) शासन महसुल व वन विभाग पत्र क्र. एलआरएफ/२६००/प्र.क्र. ३०४/ज-३ दि. २/६/२००१

**आदेश :-**

मौजे. मालवणी तालुका बोरीवली स. नं. २६३(पै) न.भू.क्र. ६अ(पै.) मधील मंजूर सुधारित विकास योजनेत शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित असलेली सुमारे १०६०० चौ.मी. क्षेत्र अथर्व एज्युकेशनल ट्रस्ट या संस्थेला देण्याबाबत हेतूपत्र शासन ज्ञापन क्र. एलआरएफ २६९८/प्र.क्र. ७७०९/ज-३ दि. ६/५/२००१ अन्वये देण्यांत आले आहे. तद्नंतर याबाबत शासनाने शासन ज्ञापन दि. २७/९/९९ ने मौजे मालवणी स. नं. २६३(पै.) न.भू.क्र. ६अ(पै.) मधील शैक्षणिक संकुलातील भुखंड क्र. ८ ते १२ सुमारे १०६०० चौ.मी. क्षेत्र "अथर्व एज्युकेशनल ट्रस्ट" या संस्थेला दि. ८/२/८३ दि. ९/५/८४ तथा दि. ३०/६/९२ च्या धोरणात्मक आदेशातील अटी शर्तीवर (महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम-१९६६ व सरकारी जमीनींची विल्हेवाट लावणे. नियम ९७१ च्या तरतुदीनुसार) व दि. ६/५/९९ च्या हेतुपत्रातील अटी व शर्तीवर प्रस्तुत जमीनींचे सन १९९४ चे रु. ३२५०/- (रुपी तीन हजार दोनश पन्नास फक्त) प्रती चौ.मी. इतके तात्पुरते मुल्यांकन मानून त्यानुसार जमीनीच्या होणाऱ्या एकुण किमतीच्या ५०% सवलतीच्या रक्कमेवर प्रचलित दराने शासन परिपत्रक क्र. १०९७/२२१४/प्र.क्र. ९३/ज-१ दि. ६/८/९९ नुसार भुई भाडे आकारून अभियांत्रीकी महाविद्यालय व इतर अनुषांगिक इमारतीच्या बांधकामासाठी ३० (तीस) वर्षाच्या भाडेपट्ट्याने पुढील अतिरिक्त अटींवर मंजुर करण्यांत येत आहे.

१) प्रश्नांकित जमीनीची तात्पुरती वार्षिक भाडेपट्ट्याची रक्कम रु. २२,४२,००६/- निश्चित करण्यांत येत आहे. भाडेपट्ट्याचा कालावधी शासन ज्ञापन दि. २७/९/९९ ग्राह्य धरुन पुढे तीस वर्ष मुक्रर करण्यांत येत आहे.

२) प्रस्तुतच्या जमीनीचे मुल्यांकन नगर रचना व मुल्यनिर्धारण विभागाकडून निश्चित करण्यांत येत आहे. नगर रचना व मुल्य निर्धारण विभागाने निश्चित केलेले अंतिम मुल्यांकन तात्पुरत्या मुल्यांकनाहून जास्त असल्यास फरकाची रक्कम प्रचलित दराने व्याजासह भरणा करण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी कळविल्यापासून एक महिन्यात भरणा करण्यात येईल (संस्थेने तसे दि. ४/८/९९ रोजी हमीपत्र सादर केले आहे)

३) भाडेपट्ट्याच्या दरात दहा वर्षांनी सुधारणा करण्यांत यावी.

४) प्रदान करण्यांत येणारी जमीन किंवा तिचा भाग कोणत्याही प्रकारे संस्थेस शासनाच्या तसेच जिल्हाधिकारी यांच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरित करता येणार नाही. किंवा परवाना जमीनीचे हस्तांतर झाल्यास प्रदान करण्यांत येणारी जमीन तिच्यावरील बांधकामासह पुनंग्रहित करण्यांत येईल व याबाबत संस्थेस कोणत्याही प्रकारचा मोबदला मिळणार नाही. जमिनीच्या हस्तांतरास परवानगी देण्याचा अधिकार सर्वस्वी शासनास राहील. शासन याबाबतीत ज्या अटी शर्ती ठरवील त्या संस्थ विना तक्रार मान्य करील. पुर्व परवानगीने हस्तांतर केल्यास त्या जमीनीच्या विक्रीपासून होणाऱ्या किमतीच्या ५०% अनर्जित रक्कम संस्थेला शासनाकडे भरावी लागेल.

५) प्रश्नांकित जमीनीस संस्था प्रस्तावित इमारतीचे बांधकाम ताबा घेतलेल्या दिनांकापासुन दोन वर्षांच्या कालावधीत पूर्ण करील. प्रदान करण्यांत येणाऱ्या जमीनीचा उपयोग शैक्षणिक प्रयोजनासाठीच करावा लागेल.

६) शासनाने मंजूर केलेली जमीन, त्यावर केलेले बांधकाम तात्पुरत्या किंवा कायम स्वरुपी शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरीत करता येणार नाही. याबाबत मंजूरी देण्याचे अथवा नाकारण्याचे पूर्ण स्वातंत्र्य शासनास राहील.

७) महाविद्यालय तसेच महाविद्यालय चालवित असलेली इतर अनुषांगिक शैक्षणिक उपक्रम सर्वांना खुले रहातील त्यामध्ये धर्म, लिंग इत्यादी भेदभाव केला जाणार नाही.

C:\desk-7A\Atharv.doc

Scanned by CamScanner

८) मंजूर जमिनीचा कोणत्याही प्रकारे अनधिकृत रित्या वापर केल्यास किंवा वापरात बदल केल्यास जमीन शर्तभंगाखाली काढून घेण्यांत येईल तसेच तसे केल्याबद्दल महाराष्ट्र जमिन अधिनियम, १९६६ च्या कलम ६७ अन्वये आकारणी करून दंडनिय रक्कम वसुल करण्यांत येईल. जमीन मंजूरीच्या कोणत्याही अटी/शर्तीचा भंग झाल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य त्या कार्यपध्दतीचा अवलंब करून सदर जमीन सरकार जमा करण्याचे शासनास स्वातंत्र्य राहील.

९) मंजूर जमीनीवरील सर्व खाण खनिज पदार्थ व दगडखाण त्यावरील शासनाचे अधिकार अबाधित रहातील. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मध्ये तरतदु केल्याप्रमाणे दगड भरणीचे काम करण्यासाठी व त्याचा शोध घेण्यासाठी सर्व बाजूंनी सोयीसह त्या ठिकाणापर्यंत पोहोचण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य शासनास राहील.

१०) भविष्य काळात सदर जमिन किंवा तिचा कोणताही भाग कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असल्यास जमीनीच किंवा त्या भागाचे वाटप रद्द करण्यात येईल आणि प्रस्तुतची जमीन किंवा तो घ्यावयाचा असेल असा त्याचा भाग यासाठी संस्थेने भरलेल्या किमतीची किंवा इतकी रक्कम तसेच त्यावर एखादी इमारत किंवा बांधकाम कांही असल्यास त्याची किंमत संस्थेला भरपाई म्हणून दिल्यानंतर शासन परत घेईल. एखादी जमीन किंवा तिचा भाग सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा कसे या संबंधात तसेच त्या जमीनीवर जी इमारत किंवा संरचना असेल, त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग व गृहनिर्माण विभागाच्या कार्यकारी अभियंत्याने ठरविलेली किंमत या संबंधात शासनाचा निर्णय संस्था अंतिम म्हणून स्विकारेल.

११) मंजूर जमीनीचा विकास व अनुषांगीक काम करण्याबाबत द्यावयाचा खर्च संस्थेस स्वतः करावा लागेल.

१२) भाडेपट्ट्याचा करारनामा यथावकाश करण्यांत येईल.

अथर्व एज्युकेशनल ट्रस्ट ने मंजूर जमीनीचा ताबा घेण्यासाठी नगर भुमापन अधिकारी, गोरेगांव यांचेशी संपर्क साधावा.

सही/-xxx

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रती,

सचिव,
अथर्व एज्युकेशनल ट्रस्ट, ८६ जी/माधव भुवन,
एन. एम. जोशी मार्ग, मुंबई - ४०० ०१५

प्रत : १) नगर भुमापन अधिकारी, गोरेगांव यांचेकडे माहितो व आवश्यक त्या कार्यवाहीस रवाना.

२/- त्यांनी प्रश्नाधीन जमीनीचा ताबा तहसिलदार, बोरीवली यांचे मंडळ अधिकारी संमक्ष देऊन नगर भुमापन अभिलेखात योग्यते फेरफार करून त्यांच्या उताऱ्यासह ताबा पावती नकाशाच्या प्रतीसह पूर्तता अहवाल सादर करावा.

२) तहसिलदार, बोरीवली यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

२/- त्यांनी संबंधीत मंडळ अधिकारी यांना जागेचा ताबा संस्थेस देतेवेही हजर राहण्यास सांगावे व जमीनीचा ताबा संस्थेस दिल्यावर गावचे अभिलेखात योग्यते फेरफार करून त्याचा पूर्तता अहवाल सादर करावा संस्थेकडून चालू वर्षापर्यंत भाडेपट्ट्याची रक्कम वसुल करण्यांत यावी व संस्थेने भाडेपट्टा भरला असल्यास भरणा केलेली रक्कम समायेजीक करण्यांत यावी.

३) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३ यांचेकडे प्रश्नांकीत जमीनीचे सन १९९४ चे अंतिम मुल्यांकन सादर करण्यांस रवाना.

४) मा. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांचेकडे माहितीसाठी रवाना.

स्वछ प्रतीवर जिल्हाधिकारी यांनी सही केली आहे

जिल्हाधिकारी,

मुंबई उपनगर जिल्हा कार्यालय

C:\desk-7A\Atharv.doc

Scanned by CamScanner

क्रमांक एलआरएल २६९८/प्र.क्र. ७७०९/ज-३
महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक २७/९/९९

विषय- **जमिन- मुंबई उपनगर जिल्हा**
मौजे मालवणी स. नं. २६३ पै. नभूक्र. ६ अ पै मधील शैक्षणिक संकुलातील जमीन अथर्व एज्युकेशनल ट्रस्ट या संस्थेला अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी मंजूर करणे बाबत.

**शासन ज्ञापन:**

मौजे मालवणी ता. बोरीवली स. नं. २६३ पै, नभूक्र. ६ अ पै मधील मंजूर सुधारीत विकास योजनेत शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित असलेली सुमारे १०,६०० चौ.मी. क्षेत्र ''अथर्व एज्युकेशनल ट्रस्ट '' या संस्थेला देण्याबाबत हेतूपत्र शासन ज्ञापन समक्रमांक दिनांक ६ मे १९९९ अन्वये देण्यात आले आहे. याबाबत शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, मौजे मालवणी स. नं. २६३ पै, नभूक्र ६ पै मधील शैक्षणिक संकुलातील भूखंड क्रमांक ८ ते १२ सुमारे १०,६०० चौ.मी. क्षेत्र ''अथर्व एज्युकेशनल ट्रस्ट'' या संस्थेला दिनांक ८/२/८३ , दिनांक ११/५/८४ तथा दिनांक ३०/६/९२ च्या धोरणात्मक आदेशातील अटी व शर्तीवर (महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे नियम १९७१ च्या तरतूदीनुसार ) व दिनांक ६ मे १९९९ च्या हेतूपत्रातील अटी व शर्तीवर प्रस्तुत जमिनीचे सन १९९४ चे रुपये ३२५०/- (रुपये तीन हजार दोनशे पन्नास फक्त ) प्रती चौ. मी. ला इतके तात्पुरते मुल्यांकन मानुन त्यानुसार जमिनीच्या होणा-या एकूण किंमतीच्या ५०% सवलतीच्या रक्कमेवर प्रचलित दराने शासन परिपत्रक क्रमांक १०९७/२२१४/प्र.क्र. ९३/ज-१ दिनांक ६/८/९९ नुसार भुईभाडे आकारुन अभियांत्रिकी महाविद्यालय व इतर अनुषंगिक इमारतींच्या बांधकामासाठी ३० वर्षांच्या भाडेपट्टयाने पुढील अतिरिक्त अटींवर मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुतच्या जमिनीचे मुल्यांकन नगररचना व मुल्यनिर्धारण विभागाकडून तात्काळ करुन घेण्यात यावे.

२) नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागाने निश्चित केलेले अंतिम मुल्यांकन तात्पुरत्या मुल्यांकनाहून जास्त भरल्यास फरकाची रक्कम प्रचलित दराने

जिल्हाधिकारी मुंबई
उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

Scanned by CamScanner

व्याजासह भरणा करण्यास जिल्हाधिका-यांनी कळविल्यापासून १ महिन्यात भरणा करण्यास तयार असल्याचे हमीपत्र संस्थेकडून घ्यावे.

३) भाडेपट्टयाच्या दरात दर १० वर्षांनी सुधारणा करण्यात यावी.

४. हेतुपत्रातील अट क्र. २ व ३ मधील आवश्यक असलेली माहिती तसेच संकल्पित बांधकामच्या प्रकल्पाचा सविस्तर तपशील संस्थेने तात्काळ जिल्हाधिकारी यांना पुरवावा.

५) सदर संस्था सर्व जातीधर्मांच्या व्यक्तींसाठी खुलीअसली पाहिजे.

६) जिल्हाधिका-यांना योग्य वाटतील अशा इतर अटी व शर्ती.

२. हे ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने (अनौपचारिक संदर्भ क्र. ७८९/९९/व्यय-९, दिनांक १२.७.९९) निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

(द.शि. फाटक)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
एम.एम.आर.डी.ए. इमारत,
वांद्रे (पूर्व) मुंबई -५१.

प्रतिलीपी :-

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) उपसंचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई.
४) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा वअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
५) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा ), मुंबई/नागपूर
६) जिल्हा उपनिबंधक (३), सहकारी संस्था, तळमजला, म्हाडा इमारत, वांद्रे (पूर्व),मुंबई-५१.
७) सहाय्यक संचालक, नगररचनाव मूल्यनिर्धारण, मुंबई उपनगर जिल्हा
८) नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९) वित्त विभाग, (व्यय-९),मंत्रालय,मुंबई.
१०) ज-३ कार्यासन, (निवडनस्ती)

Scanned by CamScanner

405

क्र. :जि/कार्या-छा/का वि-662 /जमिन/९९

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
एम. एम. आर. डी. ए. इमारत, २रा मजला,
बांद्रा [पूर्व], मुंबई - ४०० ०५१.

दिनांक :- 12/10/1999.

प्रति,

श्री सुनिल राणे
सचिव,
अथर्व एज्युकेशन ट्रस्ट,
८६/बी/माधव भुवन,
एन. एम. जोशी मार्ग,
मुंबई-४०० ०१५

विषय :- जमीन = मुंबई उपनगर जिल्हा.

मौजे मालवणी, स. क्र. २६३पै, नमूक्र. ६अ येथील भूखंड अथर्व एज्युकेशन ट्रस्टला अभियांत्रिकी महाविद्यालया साठी मंजूर करण्याबाबत....

संदर्भ :- १)एलआरएफ-२६९८/प्र.क्र. ७७०९/ज-३, दि. ६मे१९९९
२)शासन ज्ञापन क्र. एलआरएफ-२६९८/प्र.क्र. ७७०९/ ज-३, दिनांक २७. ९. १९९९.

-----

महोदय,

उपरोक्त संदर्भात नमूद केलेल्या क्र. १ च्या पत्रान्वये शासनाने आपणांस पत्राचे तारखेपासून ६ महिन्याच्या आंत पत्रामध्ये नमूद अटीची पुर्तता करण्याबाबत कळविले आहे.

तसेच संदर्भात नमूद शासन ज्ञापनानुसार मौजे मालवणी, तालुका बोरीवली, स. नं. २६३, नमूक्र. ६अ पै. मंजूर सुधारीत विकास योजनेत शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित असलेली सुमारे १०,६००चौ.मी. क्षेत्र "अथर्व एज्युकेश ट्रस्ट" या आपल्या संस्थेला दिनांक ८. २ १९८३, दिनांक ११. ५ १९८४ तसेच दिनांक ३०. ६. १९९३ च्या धोरणात्मक आदेशातील अटी शर्ती व दिनांक ६. ५. १९९९ च्या संदर्भात नमूद केलेल्या हेतुपत्रातील अटी व शर्तींवर जमीनीचे सन १९९४ चे रु. ३,२५०/- [रुपये तीन हजार दोनशे पन्नास फक्त] प्रती चौ.मी. तात्पुरते मुल्यांकन मानून एकूण किंमतीच्या ५०% सवलतीच्या रक्कमेवर प्रचलित दराने शासन परिपत्रक दिनांक ६. ८. १९९९ नुसार १२% भुईभाडे आकारुन अभियांत्रिकी महाविद्यालय व इतर अनुषंगिक इमारतीच्या बांधकामासाठी ३० वर्षांच्या भाडेपट्टयाने

[कृ. मा. पहा]

Scanned by CamScanner

पुढे नमूद केलेल्या अतिरिक्त अटींवर मंजूर करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

तथापि, संस्थेने खालील अटींची पुर्तता केल्यानंतर जमीन मंजूरीचे आदेश देण्यांत येतील.

१) प्रस्तांवित जमीनीचे तात्पुरते वार्षिक भाडेपट्ट्याची रक्कम रु २२,४२,००६.००मात्र (रुपये बावीस लाख बेचाळीस हजार सहा मात्र) चा धनाकर्ष "जिल्हाधिकारी",मुंबई उपनगर जिल्हा" यांचे नांवे काढावा व या कार्यालयांत करावा.

२) जमीन प्रदान आदेशातील अटी व शर्ती मान्य असलेबाबत तसेच नगर रचना व मुल्यनिर्धारण विभागाने निश्चित केलेले अंतिम मुल्यांकन, तात्पुरत्या मुल्यांकनाहून जास्त आल्यास फरकाची रक्कम प्रचलित दराने व्याजासह भरणा करण्यास कळविल्यापासून १ महिन्यांत भरणा करण्यांस तयार असल्याबाबतचे रुपये२०/- च्या मुद्रांकित पेपरवरील हमीपत्र द्यावे.

३) शासन हेतूपत्र दिनांक ९ मे,१९९९ मधील अट क्र. २ व ३ मधील आवश्यक असलेली माहिती तसेच संकल्पित बांधकाम प्रकल्पाचा सविस्तर तपशिल संस्थेने तात्काळ या कार्यालयांस पुरवावा.

४) सदर संस्था सर्व जाती धर्मांचा व्यक्तिसाठी खुली असली पाहिजे.

तरी वरीलप्रमाणे भाडेपट्ट्याची रक्कम भरणा करुन, मुद्रांकित पेपरवरील हमीपत्र त्वरीत या कार्यालयांस सादर करावे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करीता.

मूळ प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे.

मे१११०९९

Received
13/5/99